**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४०३/२०२३ मधील नि.क्र.२५ खालील आदेश</u>...**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.३ याने कैफीयत दाखल करण्यास झालेला १३ दिवसांचा विलंब माफ होवुन कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे अर्जातील कथनाप्रमाणे, या प्रतिवादीस दिनांक ०२.०७.२०२४ रोजी प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.३ हे वयोवृध्द् असल्यामुळे ते नेहमी आजारी असतात. त्यामुळे त्यांना तारखे दिवशी हजर राहुन आपली कैफीयत मुदतीत दाखल करता आली नाही. सदरचा जबाब दाखल करणेकामी या प्रतिवादीने जाणुनबुजुन हेतुपुरस्सर विलंब केलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होणेविषयी या प्रतिवादीने विनंती केली आहे. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश होणेविषयी विनंती केली आहे.

२. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला व या कामातील कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, या प्रतिवादींना प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक १५.१०.२०२४ रोजी याकामी हजर झाले. परंतु, त्यांनी आपली कैफीयत / म्हणणे मुदतीत दाखल केलेली नाही. परंतु, असे जरी असले तरी याकामी जर या प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी न दित्यास ते त्यांच्या न्यायहक्कास मुकणार आहेत. त्यांची कैफीयत/ म्हणणे याकामी सामील केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदर म्हणणे कामात सामील झालेस दाव्याचा निकाल गुणदोषावर होईल. परंतु लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्च सरकारजमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ५००/— (रुपये पाचशे मात्र) इतका खर्च पुढील तारखेच्या आत सरकारजमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी ३ यांनी वरील खर्चाची रक्कम भरल्यानंतर त्यांनी सादर केलेली लेखी कैफियत अभिलेखावर घ्यावी.

सही/—

**(आर.एस. कानडे)**

**दिनांक: ०७.०४.२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिन्नर.**

**नियमीत दिवाणी दावा क्र.४०३/२०२३ मधील नि.क्र.२२ खालील आदेश...**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ याने कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ हा पुणे येथील रहीवासी असून त्याचा व्यवसाय पुणे व महाराष्ट्र राज्यात व इतर राज्यात देखील आहे. त्यामुळे त्याला कैफीयत दाखल करणेकामी आवश्यक ते कागदपत्रे जमवाजमव करुन मुदतीत वकीलांसोबत चर्चा करुन कैफीयत व जबाब दाखल करण्यास ७ महिने ०५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता या प्रतिवादीची वादी व इतर प्रतिवादींदी फसवणुक करुन बेकायदेशिरपणे खरेदीखते अस्तित्वात आणलेली आहेत. त्याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक असल्याने प्रतिवादी क्र.१ ने त्यानुसार आपली कैफीयत या अर्जासोबत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ ची कैफीयत पटलावर न घेतल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याच्या दृष्टीने सदर अर्ज मंजुर होणेस प्रतिवादी क्र.१ याने विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील नमुद कारणे योग्य नसुन केवळ दाव्यास विलंब व्हावा या हेतुने प्रतिवादी क्र.१ विलंबाने आपली कैफीयत दाखल करत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज रद्द होणेविषयी प्रतिवादी क्र.१ ने विनंती केली आहे.

२. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला व या कामातील कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, या प्रतिवादीला प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर तो दिनांक १४.१२.२०२३ रोजी या कामी हजर झाला, परंतु त्याने आपली कैफीयत / म्हणणे मुदतीत दाखल केलेले नाही. परंतु, असे जरी असले तरी याकामी जर या प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी न दित्यास तो त्याच्या न्यायहक्कास मुकणार आहत. त्यांची कैफीयत/ म्हणणे याकामी सामील केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदर म्हणणे कामात सामील झालेस दाव्याचा निकाल

गुणदोषावर होईल. परंतु लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज वादीला खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ५००/— (रुपये पाचशे मात्र) इतका खर्च वादीला पुढील तारखेच्या आत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र.१ याने वरील खर्चाची रक्कम भरल्यानंतर त्याने सादर केलेली लेखी कैफियत अभिलेखावर घ्यावी.

**(आर.एस. कानडे)**

**दिनांक: ०७.०४.२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिन्नर.**

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४०३/२०२३ मधील नि.क्र.२० खालील आदेश</u>...

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे अर्जातील कथनाप्रमाणे, सदर दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द् ठरावासाठी व मनाई हुकूममासाठी दाखल केला आहे. मे—२०२४ या महिन्यामध्ये न्यायालयास उन्हाळी सुट्टी असल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी आपली कैफीयत मुदतीत दाखल करु शकले नाहीत. सदरचा जबाब दाखल करणेकामी प्रतिवादींनी जाणुनबुजुन हेतुपुरस्सर विलंब केलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होणेविषयी या प्रतिवादींनी विनंती केली आहे. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश होणेविषयी विनंती केली आहे.

२. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला व या कामातील कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, या प्रतिवादींना प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक ०५.०२.२०२४ रोजी याकामी हजर झाले. परंतु, त्यांनी आपली कैफीयत / म्हणणे मुदतीत दाखल केलेली नाही. परंतु, असे जरी असले तरी याकामी जर या प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी न दित्यास ते त्यांच्या न्यायहक्कास मुकणार आहेत. त्यांची कैफीयत/ म्हणणे याकामी सामील केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदर म्हणणे कामात सामील झालेस दाव्याचा निकाल गुणदोषावर होईल. परंतु लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्च सरकारजमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ५००/— (रुपये पाचशे मात्र) इतका खर्च पुढील तारखेच्या आत सरकारजमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांनी वरील खर्चाची रक्कम भरल्यानंतर त्यांनी सादर केलेली लेखी कैफियत अभिलेखावर घ्यावी.

**(आर.एस. कानडे)**

**दिनांक: ०७.०४.२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सिन्नर.**